सार्वजनिक आरोग्य विभाग, सिंधुदुर्ग

जा.क्र.सिंजिप/आवि/499/2020
जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग

दिनांक- 30 / 06 /2020

सार्वजनिक आरोग्य विभाग, सिंधुदुर्ग अधिनिस्त खालीलप्रमाणे नमुद करणेत आलेली मनुष्यबळ भरती कोवीड - 19 उपचारासाठी जिल्हयात कोरोनाचा कोवीड - 19 वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकची आरोग्य सेवा देण्याकरिता DCH, DCHC, CCC येथे कोवीड - 19 साथीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत खालील प्रस्तावित पदे तीन महिने किंवा कोवीड -19 साथ असेपर्यंत, जे आधी घडेल ते या कालावधीसाठी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी आवश्यतेप्रमाणे कंत्राटी पद्धतीने मानधन तत्वावर भरणेसाठी प्रतिक्षा यादीकरणेकरिता अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | शैक्षणिक अर्हता | पदांची संख्या | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | फिजिशिअन | MD MEDICINE | ४ | रु. ७५०००/- |
| २ | वैदयकिय अधिकारी | MBBS | २४ | रु. ६००००/- |
| ३ | आयुष वै. अधिकारी | BAMS/BUMS | ३६ | रु. ३००००/- |
| ४ | हॉस्पिटल मॅनेजर | Any Medical Graduate With 1 Year Experience of Hospital Administration | २० | रु. ३५०००/- |
| ५ | स्टाफ नर्स | GNM/ BSC Nursing (Maharashtra Nursing Council Registration) | ९६ | रु. २००००/- |
| ६ | एक्स रे टेक्निशिअन | Retd X- Ray Technician | २ | रु. १७,०००/- |
| ७ | ईसीजी टेक्निशिअन | Experience of ECG Technician at least 1 Year | ५ | रु. १७,०००/- |
| ८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | B.sc DMLT | २० | रु. १७,०००/- |
| ९ | औषधनिर्माता | B.Pharm/ D.Pharm | ७ | रु. १७,०००/- |
| १० | डिईओ | Any Graduate Typing Marathi 30 wpm and English 40 wpm with MSCIT (but B.Com will be preferred) | २१ | रु. १७,०००/- |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमित प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) सदर सेवा ही तीन महिने किंवा कोवीड-19 साथ असेपर्यंत, जे आधी घडेल ते या कालावधीसाठी राहिल

३) सदर सेवा निव्वळ कोवीड - 19 उपचारासाठी तसेच जिल्हयातील उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणा-या अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता लक्षात घेऊन ठराविक कालावधीसाठी आहेत. भरावयाची पदे राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेदवारास राहणार नाहीत. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील.

४) सार्वजनिक आरोग्य विभागातुन सेवानिवृत्त कर्मचारी विहित मयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेचा निकष पुर्ण करीत असतील तर अर्ज करु शकतील.

५) पदभरतीची विस्तृत जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद, सिंधुदुर्गचे संकेतस्थळावर www.zpsindhudurg.maharashtra.gov.in प्रसिद्ध करणेत येणार आहे. याबाबत अर्जदारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके एकत्र स्कॅन करुन एकच पीडीएफ फाईल करुन dpmsindhudurg@gmail.com (डिपीएमसिंधुदुर्गॲटदरेटजीमेलडॉटकॉम) या मेलआयडीवर दिनांक 01 / 07/2020 ते 08/07/2020 या कालावधीपर्यंत पाठविणेची आहेत. विहित कालावधी संपुष्टात आलेनंतर अर्जाचा विचार करता येणार नाही. तसेच दिलेल्या ई मेल आयडी व्यतिरिक्त अन्य ईमेल आयडीवर अर्ज सादर केला असेल तर तो ग्राहय धरणार नाही. प्रत्यक्ष हाती किंवा टपालातुन आलेले अर्ज स्विकारणेत येणार नाही. विहित ई- मेल आयडीवर एका उमेदवाराने एकच अर्ज एकापेक्षा जास्त वेळा सादर केलेला असेल तर प्रथम पाठविलेल्या अर्जाचा विचार करणेत येईल याची पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) निवड झालेल्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचा-यांप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बॉन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

७) वयोमर्यादा- वैदयकिय अधिकारी, एमबीबीएस, स्पेशालिस्ट या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 61 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 70 वर्षे राहिल. स्टाफ नर्स, तंत्रज्ञ, औषधनिर्माता या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 59 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 65 वर्षे राहिल. उर्वरीत सर्व पदांचे भरतीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा 38 वर्षे व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी 43 वर्षे राहिल. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश मर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात आलेली आहे. 60 वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यतेचे प्रमाणपत्रक ( मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य राहिल.

८) विहित सांक्षांकित प्रमाणपत्राबाबत- पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या उत्तीर्ण वर्षाची मार्कलिस्ट, उच्च शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या उत्तीर्ण वर्षाची मार्कलिस्ट याचे साक्षांकित प्रती, वयाचे सबळ पुराव्यासाठी शाळा सोडलेचा दाखला किंवा आधारकार्ड, शासकीय अगर निमशासकीय कामाचे अनुभव प्रमाणपत्र, या विहित प्रमाणपत्रांव्यतिरिक्त अन्य
कोणतेही प्रमाणपत्र सादर करणेत येऊ नये. याची उमेदवारांनी नोंद घ्यावयाची आहे. सर्व प्रती साक्षांकित असणे आवश्यक आहे. विहित शैक्षणिक अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांनी अर्ज करावयाचा आहे. अर्ज स्वच्छ अक्षरात व खाडाखोड न करता विहित व आवश्यक माहितीसह भरणे आवश्यक राहिल.

९) अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची विहित शैक्षणिक अंतिम वर्षाच्या टक्केवारीच्या 70 टक्के (70 गुण), शासकीय व निमशासकीय अनुभव (एका वर्षासाठी 4 गुण याप्रमाणे एकूण 20 गुण) व उच्च शैक्षणिक अर्हता (10 गुण) असे एकूण 100 गुण या तीन बाबींचे आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करणेत येऊन जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल. या यादीवर उमेदवारांची हरकत असेल तर पुराव्यानिशी dpmsindhudurg@gmail.com (डिपीएमसिंधुदुर्गॲटदिरेटजीमेलडॉटकॉम) या मेल आयडीवर हरकती मागवून घेणेत येतील. हरकती प्राप्त झालेनंतर त्याची विहित नोंद घेऊन अंतिम प्रतिक्षा यादी तयार करणेत येऊन सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वेबसाईटला प्रसिध्द करणेत येईल. प्रतिक्षा यादीचे गुणानुक्रमे व आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती आदेश देणेत येतील. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांनी हजर होणेपुर्वी आपली मुळ प्रमाणपत्रके जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून तपासून घेणे बंधनकारक आहे.

१०) कोवीड 19 साठी पदांचे आवश्यकतेनुसार व प्रतिक्षा यादीचे क्रमांकानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देय राहतील.

११) अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१२) उपरोक्त नमुद करणेत आलेल्या पदांबाबत विस्तृतपणे निवडीच्या अटी व शर्ती तसेच इतर आवश्यक पदभरतीची विहित सर्व माहिती जिल्हा परिषद संकेतस्थळ www.zpsindhudurg.maharashtra.gov.in यावर पाहण्यास उपलब्ध राहिल.

१३) शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची प्रशासकीय/ वित्तिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१४) आवश्यकतेप्रमाणे पदांचे संख्येमध्ये कमी अगर जास्त बदल करणेचे अधिकार राखून ठेवणेत आलेले आहेत

१५) भरती प्रकियेतील सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिंधुदुर्ग अधिनिस्त सिधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

## विहित अर्जाचा नमुना

मा. अध्यक्ष, निवड समिती
तथा जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग.

मी खालीलप्रमाणे माझी विहीत केलेल्या पदासाठी माहिती देत आहे.

1) पदाचे नाव- ------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

2) अर्जदाराचे संपुर्ण नाव (मराठी) -

3) अर्जदाराचे संपुर्ण नाव (इंग्रजी) - ------------------------------------------------------------------------------------

4) कायमस्वरुपी निवासस्थानाचा पिनकोडसहीत संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

______________________________________________________________________________

5) दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक- ---------------------------------------------------

6) ई- मेल आयडी ------------------------------------------------

7) जन्मतारीख - / / तसेच माहे 31/05/2020 अखेर पुर्ण वय- --------- वर्षे व -------- महिने

8) शैक्षणिक अर्हता-

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विदयापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

कृपया मागे पहावे

9) अनुभव-

| अ.क्र. | शासकीय/निमशासकीय/ संस्थेचे नाव/ पत्ता व दुरध्वनी | कालावधी | | एकूण अनुभव कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

10) उमेदवाराचे न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण अगर त्यासारखी कारवाई चालु आहे काय? असलेस त्याचा तपशील दयावा.

| होय | नाही |
|---|---|
| | |

11) अर्जासोबत खालीलप्रमाणे साक्षांकित सत्यप्रती जोडलेल्या आहेत

1) ------------------------------------------------------------------------

2) ------------------------------------------------------------------------

3) ------------------------------------------------------------------------

4) -------------------------------------------------------------------------------

12) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? आहे/ नाही

मी असे प्रमाणित करते/ करतो की उपरोक्त नमुद माहिती खरी आहे. सदरची माहिती खोटी अथवा प्रशासनाला दिशाभुल करणारी वाटलेस माझी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल व माझेवर कायदेशीर कारवाई करणेत येईल याची मला जाणीव आहे.

सही/-

उमेदवाराचे पुर्ण नाव

---

कार्यालयीन कामकाजासाठी

अपात्र असलेचे कारण

1) ----------------------------------------------------- -2) -------------------------------------------------------

तपासणी अधिकारी यांचे पुर्ण नाव
हुद्दा व स्वाक्षरी

नियंत्रण अधिकारी यांचे पुर्ण नाव
हुद्दा व स्वाक्षरी